International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.1 Sept-Oct 2023

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कार्याचा सविस्तर आढावा

**अमित अशोक पाटील**
संशोधक विद्यार्थी
**Corresponding Author – अमित अशोक पाटील**
**Email:** aapatil9449@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14059280**

## प्रस्तावना

स्वातंत्र्यवीर विमाना एक दामोदर सावरकर यांचा जन्म भगूर (नाशिक) या गावी २८ मे १८८३ साली झाला. ही भारतीय स्वातंत्र्य सैनिक, राजकारणी, समाज सुधारक, मराठी कवी व लेखक होते. तसेच ते हिंदुत्वज्ञ आणि भाषा शुद्धी व लिपी शुद्धी या चळवळीचे प्रणेते होते. १९३८ च्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. हिंदुत्व या संकल्पनेचे प्रणेते होते. सावरकरांच्या मतानुसार हिंदुत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे-

"आसिंधू सिंधू पर्यन्ता, यस्य भारत भूमिका। पितृभू पुण्यभूश्चेव स वै हिंदूरिती स्मृत॥" त्यांचे वडील दामोदरपंत सावरकरांच्या तीन मुलांपैकी ते दुसरे होते. बाबाराव सावरकर हे मोठे बंधू तर नारायणराव सावरकर हे धाकटे बंधू होते. सावरकरांची आई ते नऊ वर्षाचे असताना वारली. थोरल्या बंधूंच्या पत्नी येसूवहिनी यांनी त्यांचा सांभाळ केला. सावरकरांचे वडील १८९९ साली प्लेगच्या साथीने मृत्युमुखी पडले. सावरकरांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात झाले. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी स्वदेशीचा फटका, स्वातंत्र्याचे स्त्रोत या रचना केल्या. १८९७ साली रँड व आयर्स्त यांच्या खुनाच्या प्रकरणात चाफेकर बंधूंना फाशी झाली. या घटनेचा सावरकरावर खूप मोठा दूरगामी परिणाम झाला. यामुळेच १८९८ साली वयाच्या पंधराव्या वर्षी अष्टभुजा कुलदेवतेसमोर मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती करून अखेरच्या श्वासापर्यंत मरता मरता लढत राहीन अशी शपथ घेतली. सावरकर हे जोसेफ मॉझिनी व शिवराम परांजपे यांना ते गुरु मानत. सावरकर हे फक्त स्वातंत्र्य सैनिक नव्हते तर ते एक थोर समाज सुधारक सुद्धा होते. त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य खूप मोठ्या प्रमाणावर केले. रत्नागिरी येथे पतीत पावन मंदिराची स्थापन करून त्यांनी सामाजिक मागासलेपण दूर करण्याचा प्रयत्न केला. सावरकरांचे व्यक्तिमत्व खूपच अष्टपैलू स्वरूपाचे होते. सावरकरांच्या एकूण चरित्र, कार्य व विचारांचा आढावा आपण पुढे पाहूयात.

## उद्दिष्ट्ये

१. वि. दा. सावरकर यांच्या क्रांतिकार्याचा आढावा घेणे.
२. वि. दा. सावरकर यांच्या अस्पृश्यता निर्मूलन व हिंदू महासभेच्या कार्यावर प्रकाश टाकणे.
३. वि. दा. सावरकर यांनी लिखित वाङ्मय ग्रंथ जाणून घेणे.

## विवाह

विनायक दामोदर सावरकर यांचा विवाह रामचंद्र त्र्यंबक चिपळूणकर यांची मुलगी यमुनाबाई यांच्याशी १९०१ साली झाला.

## शिक्षण आणि क्रांतिकार्य

१९०४ साली सावरकरांना फरगुशन महाविद्यालयात प्रवेश मिळाला. १९०५ साली बंगालच्या फाळणी नंतर पुण्यात विदेशी मालाची होळी केली तेथे टिळक व परांजपे उपस्थित होते. त्यामुळे त्यांना फर्ग्युसन कॉलेज सोडावे लागले. तत्पूर्वी इटालियन क्रांतिकारक आणि विचारवंत जोसेफ मॉझिनी यांच्या यंग इटली या संस्थेच्या धर्तीवर १९०४ साली अभिनव भारत या क्रांतिकारी संघटनेची स्थापना केली. त्यापूर्वी १९९९ साली राष्ट्रभक्त समूह व १९०० साली मित्रमेळा या संघटनाची स्थापना मस्कर व पागे या दोन साथीदारांच्या सहाय्याने केली. याचेच रूपांतर नंतर १९०४ साली अभिनव भारत या संघटनेत झाले. अभिनव भारत या संघटनेस गणेशपंत उर्फ बाबाराव सावरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अभिनव भारताचे मुख्यालय नाशिक येथे असून मादाम कामा, मदनलाल धिंग्रा, भाई परमानंद, वाय.एस.अय्यर, ग्यानचंद वर्मा, वीरेंद्र चटोपाध्याय, सेनापती बापट हे सर्व अभिनव भारताचे सदस्य बनले. सशस्त्र क्रांतीने भारताचे राजकीय स्वातंत्र्य हे अभिनव भारताचे प्रमुख ध्येय होते. तसेच परदेशामधून शस्त्र खरेदी करून भारतात पाठवणे, भारतीय सैनिकांमध्ये ब्रिटिश विरोधी प्रचार करणे, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण याद्वारे लोकमत तयार करणे, उठावाची योग्य संधी निर्माण करणे ही अभिनव भारत या संस्थेची प्रमुख उद्दिष्टे होत. अभिनव भारताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी 'विहारी' या साप्ताहिकातून सावरकरांनी लिखाणास सुरुवात केली.

लोकमान्य टिळक व शिवराम परांजपे यांनी शिफारस केल्यामुळे वि. दा. सावरकर यांना श्यामजी

कृष्णवर्मा यांनी, परदेशात उच्च शिक्षणासाठी सुरू केलेली शिष्यवृत्ती मिळाली व त्यामुळे ते १९०६ साली कायद्याच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेले व इंडिया हाऊस येथे राहू लागले. इंग्लंडला असतानाच सावरकरांनी मॉझिनीच्या आत्मचरित्राचे मराठी भाषांतर केले. इंग्रज सरकारने भारतात या पुस्तकावर बंदी घातली. तसेच त्यांनी १८५७ चे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ लिहिला. एका रशियन व्यक्तीकडून बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी तीन व्यक्ती १) हेमचंद्र दास, २) सेनापती बापट, ३) मिर्झा अब्बास यांना सावरकरांनी फ्रान्सला पाठवले. तसेच सावरकरांनी चतुर्भुज अमीन यांच्यामार्फत अभिनव भारतच्या सदस्यांना पुस्तकातून पिस्तूल पाठवले. अशाप्रकारे लंडनमधून अभिनव भारतचे क्रांतीपर्व सुरू झाले. मदनलाल धिंग्रा हा सावरकरांचा पहिला हुतात्मा शिपाई. त्याने कर्जन वायली यांची हत्या करून क्रांतीच्या धगधगत्या अग्निकुंडात आपल्या प्राणाची आहुती दिली. सावरकरांनी २२ ब्राऊनिंग पिस्तूल भारतात पाठवली. त्यातूनच नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध आनंद कान्हेरे या युवकाने केला. अभिनव भारतचे शस्त्रागारावर व बाबाराव सावरकर यांच्या घरी पोलिसांनी छापा मारला व त्यामध्ये पोलिसांना आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली व त्यामध्ये बाबाराव सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. हे आदेश नाशिकचा कलेक्टर जॅक्सन यांने दिला. त्यामुळे वि. दा. सावरकर यांच्या निर्देशामुळे कलेक्टर जॅक्सनची हत्या अनंत कान्हेरे यांनी केली. जॅक्शनच्या हत्तेमध्ये वि.दा.सावरकर यांचा सहभाग असू शकतो या संशयावरून सावरकर यांना इंग्लंडमध्ये अटक झाली. त्यांच्या मार्शेलिस बंदराजवळ त्यांनी भारताकडे जात असताना समुद्र किनारा गाठला.

पण किनाऱ्यावरील फ्रेंच रक्षकांना भाषेच्या समस्येमुळे सावरकरांचे म्हणणे कळले नाही आणि ब्रिटिश सैनिकांनी त्यांना अटक करून भारतात आणले. त्यांच्यावर १९१० साली खटला भरण्यात येऊन १९११ साली दोन वेळा जन्मठेपेची शिक्षा म्हणजेच ५० वर्षे काळयापाण्याची शिक्षा झाली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अंदमानच्या तुरुंगात ठेवले. हरप्रकारे छळले, खड्या बेडीत टांगले, मेकाच्या घाण्याला जुंपले, नारळाच्या काथ्या कुटण्याचे कष्टपद काम केले. या मरणप्राय वेदना सहन करीत असताना एकच ध्येय डोळयासमोर होते ते म्हणजे भारतीय स्वातंत्र्य. तब्बल ११ वर्ष हा छळ त्यांनी सहन केला. इतकी वर्ष छळ सहन करत त्यांनी त्यांचे कर्तव्य आणि क्रांतीकारकत्व जपले. त्यांनी तुरुंगाच्या भिंतीवर बाभळीच्या काट्याने महाकाव्य लिहिली. अंदमानमध्ये असतानाच सावरकरांनी Essential of Hindutva हा ग्रंथ लिहिला.

या ग्रंथात त्यांनी ब्रिटिशांची बदललेली धोरणे व मुस्लिम लीगचा वाढता मुजोरपणा यांचे विस्तृत विवेचन केले आहे. ब्रिटिश हे आपले मुख्य शत्रू राहिलेले नाहीत. ते कधीतरी देश सोडून जाणारच आहेत आणि मुस्लिम लीगचे देशातील राजकारणात वाढलेले प्रस्थ यावरून त्यांना हिंदू संघटन खूप महत्त्वाचे वाटत होते. विठ्ठलभाई पटेल व रंगस्वामी अयांगर या नेत्यांच्या प्रयत्नामुळे सावरकरांचा माफीनामा इंग्रजांनी मान्य केला आणि १९२४ साली त्यांची सुटका होऊन त्यांना रत्नागिरी येथे नजर कैदेत ठेवण्यात आले. रत्नागिरी येथील तुरुंगात असताना त्यांनी हिंदुत्व प्रबंध लिहिला.

**सावरकरांचे अस्पृश्यता निर्मूलन कार्य**

अंदमान मधून सुटल्यावर वि. दा. सावरकर यांना ब्रिटिशांनी रत्नागिरी येथे स्थानबद्ध केले. रत्नागिरी येथे राहून सावरकरांनी हिंदू संघटन करण्यासाठी प्रयत्न केले. हिंदू समाजाच्या अध:पतनासाठी जातीव्यवस्था व अस्पृश्यता कारणीभूत आहे हे ओळखून सावरकरांनी जात व अस्पृश्यता निर्मूलनासाठी कार्य करण्याचा निर्धार केला. हिंदू धर्मात जाती व्यवस्थेचे, विषमतेचे समर्थन आहे. हेच धर्म विकसितेचे व्रत अंगीकारले. आपल्या वक्तव्याने आणि लिखाणाने कोणी कट्टर सनातनी दुखावेल याची तमा सावरकरांनी केली नाही. अस्पृश्यता, जातिभेद, अंधश्रद्धा यांचेवर सावरकरांनी कडाडून टीका केली. अनेक मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली करून दिली. आंतरजातीय विवाह आयोजित केले, सर्वांसाठी पतीत पावन मंदिरे सुरू केली व सर्वांसाठी सामायिक भोजनालय व सहभोजनाची सुरुवात केली. जातीभेद तोडण्यासाठी त्यांनी सहभोजनाचा तडाका सुरूच केला. अशाप्रकारे सावरकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी सुद्धा व्यापक असे कार्य केले.

**हिंदू महासभा व वि. दा. सावरकर**

वि. दा. सावरकर जवळपास १३ वर्षे रत्नागिरी येथे स्थानबद्ध होते. ते १९३७ साली हिंदू महासभेचे अध्यक्ष झाले. १९३७ ते १९४४ पर्यंत ते अध्यक्ष पदावर कार्यरत होते. त्या काळात सावरकरांनी मोठ मोठ्या सभा, झंजावाती दौरे, हिंदू संघटन, विविध संघटना या माध्यमातून हिंदू महासभेला भारतीय राजकारणात सन्मान मिळवून दिला. एक क्रांतिकारक, धगधगता साहित्यिक, समाज सुधारक, हिंदू संघटक असे अनेक पैलू वि. दा. सावरकर यांच्यात होते.

अशा बहुगुणी पैलूमुळे पूर्ण भारतीय समाज सावरकरांनी ढवळून काढला. यातूनच देशाच्या फाळणीला व काँग्रेसच्या दुटप्पी धोरणाला सावरकरांनी प्रखर विरोध दर्शवला. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी सीमांची सुरक्षा, सैनिकांची संख्या वाढवणे, शस्त्र सज्जता अशा अनेक विषयांचा आग्रह धरला. वि. दा. सावरकर यांनी सुमारे सहा दशके मातृभूमीच्या स्वातंत्र्य व सुशासनासाठी अथक परिश्रम वेचले.

वि. दा. सावरकर लिखित ग्रंथ लेख पुढील प्रमाणे –

**आत्मचरित्र**

१. माझी जन्मठेप
२. शत्रूच्या शिबिरात
३. अथांग

**कादंबरी**

१. काळे पाणी
२. मोपल्यांचे बंड

**लेख**

१. मॅझीनीच्या आत्मचरित्राची प्रस्तावना
२. लंडनची बातमीपत्रे
३. गांधी गोंधळ
४. विज्ञान निष्ठा निबंध
५. गरमागरम चिवडा
६. जात्यूच्छेदक निबंध
७. स्फुट लेख
८. तेजस्वी तारे
९. हिंदुत्व
१०. हिंदुत्वाचे पंचप्राण
११. हिंदूराष्ट्र दर्शन

**नाटके**

१. संगीत उशाप
२. संगीत सन्यस्त
३. विरही
४. उत्तर क्रिया
५. बोधिसत्व

**पुस्तके**

१. १८५७ चे स्वातंत्र्यसमर
२. भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने
३. हिंदू पतपादशाही

सावरकर यांच्या मतानुसार हिंदू समाज सात बेड्यांमध्ये अडकलेला आहे.

१. स्पर्श बंदी - अस्पृश्य जातीचा स्पर्श
२. रोटी बंदी - अस्पृश्यासोबत जेवण नाही जेवणे.
३. बेटी बंदी - विशिष्ट जाती विवाह
४. व्यवसाय बंदी - निश्चित व्यवसाय
५. सिंधू बंदी - विदेश यात्रा न करणे.
६. वेदोक्त बंदी - विशिष्ट वर्गाचा निषेध
७. शुद्धी बंदी - स्वधर्मात पुन्हा येत असेल तर विरोध

**सारांश**

वि. दा. सावरकर यांनी कधी विद्यार्थी म्हणून कधी क्रांतिकारक म्हणून तर कधी समाज सुधारक म्हणून तर कधी एक जाजवल्यवंत लेखक म्हणून तर कधी एक हिंदू संघटक म्हणून अशा विविध स्वरूपात मातृभूमीची सेवा केली. यातूनच मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी मोलाची कामगिरी पार पाडली. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची मात्र आपल्या देशात उपेक्षा झालेली दिसून येते. माझ्या या छोट्याशा लेखांमधून वि. दा. सावरकर यांचे कार्य समाजासमोर दिसून यावे हाच प्रमुख उद्देश म्हणूनच हा सर्व लेखन प्रपंच केला. अशा या मातृभूमीच्या प्रिय पुत्राने १९६६ साली ८३ व्या वर्षी प्रायोपवेशनाचा निर्णय घेतला. पाणी, अन्न, औषधांचा त्याग केला व २६ फेब्रुवारी १९६६ रोजी या महान देशभक्ताचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले.

**संदर्भ ग्रंथ :**

१. वीर धनंजय, पॉप्युलर प्रकाशन, स्वातंत्र्यवीर सावरकर.
२. संपय विक्रम, कृष्णा प्रकाशन, सावरकर विस्मृतींचे प्रसाद.
३. सावरकर वि दा, एबीसी प्रकाशन, माझी जन्मठेप.
४. कटारे अनिल, विद्या बुक्स पब्लिशर्स, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास.